# बृहन्मुंबई महानगरपालिका

केंद्रीय माहितीचा अधिकार

अधनियम कलम (4)(1)(बी) नुसार

मार्गदर्शक पुस्तिका

(मॅन्युअल-I ते XVII)

टी विभाग – मुलुंड

वर्ष 2012-2013

बृहन्मुंबई महानगरपालिका

**(Manual Index)**

मार्गदर्शक पुस्तिका अनुक्रमणिका

केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार  अधिनियम 2005 कलम (4)(1)(ब) नुसार जनतेस प्रसिध्द करावयाची नियम पुस्तिका

(मॅन्यूअल)

| अनु.क्र. | नियमावली पुस्तिकेचा विषय |
|---|---|
| 1 | कार्यालयाचा तपशिल, कामकाज आणि कर्तव्ये |
| 2 | कार्यालयाचे अधिकारी आणि कर्मचारी यांचे अधिकार आणि कर्तव्ये. |
| 3 | निर्णय प्रक्रीयेसाठी अनुसरली जाणारी पध्दत, पर्यवेक्षण आणि  जबाबदारी. |
| 4 | कामकाज पूर्तता करण्यासाठी विहित केलेले निकष. |
| 5 | कामकाज कार्यवाही करण्यासाठी कर्मचा-यांकडून वापरण्यात येणारे नियम, अटी,निर्देश, नियमावली आणि  अभिलेख. |
| 6 | उपलब्ध असलेल्या अथवा अधिपत्याखाली असलेल्या दस्तऐवजाच्या (अभिलेखाच्या) वर्गवारीची यादी. |
| 7 | धोरणात्मक बाबी निश्चित करण्यासाठी अथवा त्यांची अंमलबजावणी करण्यासंबंधात जनतेच्या प्रतिनिधीत्व अथवा सल्लामसलत हेतूर्थ अस्तित्वात असलेल्या व्यवस्थेचे तपशिल. |
| 8 | कार्यालयाचा भाग म्हणून अथक सल्लामसलत हेतूर्थ नेमलेली दोन किंवा अधिक व्यक्तींचा समावेश असलेली मंडळे, परिषदा, समित्या आणि इतर संस्था यांची यादी आणि अशा मंडळ, परिषदा, समित्या व इतर यांच्या बैठका जनतेस खुल्या आहेत किंवा अशा बैठकांचे इतिवृत्त जनतेस सुसाध्य असल्यास त्याची यादी. |
| 9 | अधिकारी व कर्मचारी यांची नामदर्शिका. |
| 10 | नियमांतर्गत प्रत्येक अधिकारी आणि कर्मचारी यांना प्रतिमाह मिळणारे वेतन मोबदल्याच्या पध्दतीसह. |
| 11 | सर्व योजना, प्रस्तावित खर्च  आणि  संस्थांना केलेल्या वाटपाचा अहवाल याचा तपशिल दर्शविणारी अंदाजपत्रकातील तरतूद |
| 12 | द्रव्यसहाय्य, कार्यक्रमाच्या अंमजबजावणीची पध्दत, वाटपाची रक्कम  आणि अशा कार्यक्रमाच्या उपभोक्त्यांचा तपशिल. |
| 13 | कार्यालयात कायदेशीर हक्क, परवाने व सवलती प्रापतकर्त्याबाबत तपशिल. |
| 14 | कार्यालयात उपलब्ध असलेल्या अशा माहितीचे तपशिल जे इलेक्ट्रॉनिक स्वरुपात रुपांतरीत केले आहेत. |

| | |
|---|---|
| 15 | माहिती प्राप्त करण्यासाठी नागरीकांना उपलब्ध असलेल्या सुविधांचे तपशिल यात जनतेच्या वापरासाठी वाचनालय अथवा ग्रंथालय चालवले जात असेल तर त्याच्या कामकाजाची वेळ अंतर्भूत आहेत. |
| 16 | सार्वजनिक माहिती अधिकारी यांचे नांव, पदनाम व इतर तपशिल. |
| 17 | इतर उपयोगी माहिती. |

प्रास्तावना

**<u>उद्देश</u>**

बृहन्मुंबई महानगरपालिका ही स्वायत्त संस्था असून मुंबई शहराला नागरी सुविधा पुरविण्याची व्यवस्था करण्यासाठी मुबई महानगरपालिका अधिनियम 1888 मधील तरतूदीनुसार प्रस्थापित झालेली आहे.

साधारणपणे साडेतीन शतकापूर्वी मुंबई शहर हे लहान लहान 7 बेटांचा एक समूह होते, ज्यावर कोळी लोकांची प्रामुख्याने वस्ती होती आणि त्यांच्या उपजिविकेचे मुख्य धंदे होते मासेमारी, शंती व नारळ लागवड इ. सन 1667 मध्ये ही बेटे ईस्ट इंडिया कंपनीने धंदा व व्यापारासाठी भाडेपट्टीने घेतली व मुंबई शहराच्या सुधारणेस सुरुवात केली ज्याची आता राधानीचे शहर म्हणून ख्याती झाली आहे.

महापालिकेची सीमारेषा प्रथमत: शहर क्षेत्रापूरतीच मर्यादीत होती. सन 1950 मध्ये उपनगरी क्षेत्र जे आता एल, एम,एन,एच व के विभाग म्हणून ओळखले जातात. त्यांचा मुंबई शहरात अंतर्भाव करून त्यांना महापालिका कार्यक्षेत्रात आणण्यात आले आणि त्याच प्रकारी सन 1957 मध्ये विसतारीत उपनगरे म्हणजेचे एस,टी, पी आणि आर विभाग हे महापालिकेच्या कार्यक्षेत्रात अंतर्भूत झाले.

मुंबई शहराचे स्थानिक प्रशासनाच्या सोयीस्तव विभाग कार्यालयामध्ये विभाजन करण्यात आले व कालांतराने मोठया क्षेत्रफळाच्या विभागांचे उप विभाजन करुन आजच्या घडीस महापालिकेचे 24 विभागात विभाजन झालेले आहे. त्यापैकी मुंलूंड टीविभाग हा मुंबई उपनगराच्या उत्तर-पूर्व भागात वसला आहे. या विभागाचे एकूण क्षेत्र 45.42 चौ.कि.मी. असून सन 2011 च्या जनगणनेनुसार 341977 इतकी लोकसंख्या आहे.

**<u>वैशिष्टय</u>**

संपूर्ण मुलूंड टीविभागाची मध्य रेल्वे मार्गामुळे पूर्व व पश्चिम मुलूंड अशा दोन भागात विभागणी झाली आहे. टी विभागामध्ये मुलूंड (पर्व) येथे सर्व आवश्यक सुविधायुक्त केळकर महाविद्यालय हे शैक्षणिक संकुल आहे. या विभागाचा मोठा भाग हा निवास भाग आहे. नगर रचना योजनेमुळे मुंलूंडच्या नियोजित सुधारणेत भरच पडली आहे.

जॉन्सन ऍन्ड जॉन्सन कंपनी हा सर्वश्रृत मोठा कारखानाही या विभागातच आहे. कॉरोनरची सुविधा असलेले कामगार विमा योजना हयांचे शासकीय रुग्णालय तसेच यासारखी इतर धर्मादाय रुग्णालये या विभागात स्थानिक रहिवाश्यांना नव्हे तर पूर्व उपनगरातील जनतेला वैद्यकीय सुविधा पुरवितात. मुलुंड(पश्चिम) विभागात कालिदास नाटयगृह तसेच तरण तलाव व क्रीडा संकुल हे मुलुंडकरांचे वैभव आहे. मुंबई शहरास स्वच्छ व शुध्द पाणीपुरवठा करणारा भांडूप संकुल या नावाने ओळखला जाणारा आशिया खंडातील सर्वात मोठा जलशुध्दीकरण प्रकल्प मुलुंड(पश्चिम) विभागात आहे. मुलुंड विभागातील एल.बी.एस.मार्ग हा सध्या आधुनिक इमारती/ मोठ मोठे शॉपींग मॉल्स यामुळे मुंबईकरांचे आकर्षण ठरला आहे.

हिंदुस्थानाच्या फाळणीप्रसंगी सिंध भागातुन निर्वासित म्हणून आलेल्या सिंधी बांधवाना पर्यायी जागा देउन स्थापित केलेली मोठी सिंधी कॉलनी मुलुंड (पश्चिम)विभागात आहे.

मुलुंड विभागास मुंबईचे प्रवेशद्वार मानले जात असून लाल बहादूर शास्त्री मार्गावर तसेच दिवंगत वसंतराव नाईक पूर्व द्रुतगती मार्गावर मुंबई व नवी मुंबई यांना जोडणा-या ऐरोली पुलाजवळ असे एकूण तीन जकात नाके असून जकात स्वरुपात मोठया प्रमाणात महसूल गोळा केला जातो.

-----------------